CNR No. MHSI010005762021

<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १९/२०२१</u>

( अंकुश गावडे व. – वि. भिकाजी गवस व. – सामनेवाले)

**निशाणी २९, ३० व ३१ खालील संयुक्तीक आदेश**

(०४.०३.२०२५)

...........

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्र.१ ते ४ तर्फे कुलअखत्यारी सौ. सुषमा अंकुश गावडे यांनी, सामनेवाला क्र.३– शुभम संदीप गावडे यांचा मृत्यू दि. ०४/०८/२०२१ रोजी झाल्यामुळे, त्यांच्या वारसाचे नांव दिवाणी किरकोळ अर्जाकामी समाविष्ट करुन तशी दुरूस्ती किरकोळ अर्जात होणेकरीता, तसेच सामनेवाले क्र. ३ चे वारस अभिलेखावर दाखल करण्यास झालेला विलंब क्षमापित होणेकामी व उपशमित (Abated) चा झालेला आदेश रद्दबातल होणेकरीता, दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जाकामी सामनेवाला क्र. ३– च्या प्रस्तावित वारसाला नोटिसीची बजावणी होवून ते प्रस्तुत प्रकरणात हजर झाले, परंतु त्यांनी आपले म्हणणे दाखल करून प्रस्तुत अर्जांना आव्हान दिलेले नाही.

४. प्रस्तुत प्रकरणाचे अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रकरणात अर्जदार यांनी, नि. ३२ वर दाखल केलेल्या सामनेवाला क्र. ३– शुभम संदीप गावडे यांच्या मृत्यू प्रमाणपत्रावरुन त्यांचा मृत्यू दि.०४/०८/२०२१ रोजी झाल्याचे स्पष्ट होत आहे. अर्जदार यांना सदरहू मृतक सामनेवाल्याच्या वारसांविरूध्द अर्ज सुरू ठेवण्याचा अधिकार आहे. तसेच प्रस्तुत अर्जात नमूद केलेप्रमाणे सामनेवाला क्र. ३– चा प्रस्तावित वारस हा यापुर्वीच सामनेवाला क्र. २ म्हणून अभिलेखावर दाखल आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक

आहे.  सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज (निशाणी २९ ते ३१ ) मंजूर करणेत येत आहेत.

२. अर्जदार यांनी दिवाणी किरकोळ अर्जात नियमानुसार योग्य ती दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करून, दिवाणी किरकोळ अर्जाची सुधारीत प्रत अभिलेखावर दाखल करावी व सामनेवाले यांना पुरवावी.

HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD
Digitally signed by HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD
Date: 2025.03.05 15:54:05 +0530

(हेमंत भ. गायकवाड)
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
सिंधुदुर्ग–ओरोस.

दिनांकः– ०४/०३/२०२५